सत्र खटला क्र. 87/2014
सरकार वि. राजा उर्फ गौस अली व इतर.
निशानी क्र.90.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.4 यांची जबानी**
**मी याद्वारे शपथेवर सांगतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | पवन कन्हैया सिरीया. |
| वय | – | ३८ वर्ष |
| व्यवसाय | – | खाजगी नोकरी. |
| पत्ता | – | गिट्टीखदान, नागपुर. |

**सरतपासणी सहा. सरकारी वकिल कु. गवळी मार्फत शपथेवर सुरु** –

1. दि.२१.०९.२०१३ रोजी पोलिसांनी मला पंच म्हणुन बोलविले नव्हते. आता मला जो पंचनामा दाखविला त्यावर माझी सही नाही. असे घडले नव्हते की, आरोपी पंकज भाजे याने पोलिसांचा ताब्यात असतांना कबुली जबाब दिला होता आणि त्याप्रमाणे पोलिसांनी त्याप्रमाणे सोन्याचा रवा जप्त केला होता.

**साक्षीदार अभियोग पक्षाच्या कथनास सहायता करीत नसल्याने सहा. सरकारी वकीलांनी उलट तपासासारखे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजुर.**

**उलटतपासणी सहा. सरकारी वकिल मार्फत –**

2. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी पंकज भाजे याने पोलिसांचा ताब्यात असतांना त्याने गुन्हयात चोरी केलेले सोने इतवारी येथील सोनार अमोल खोत यास विकले आहे ते दुकान तो दाखवुन देतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिस आणि आरोपी यांचेसोबत इतवारी नागपुर येथे गेलो आणि अमोल खोत याने ते सोने पोलिसांना गाळुन रवा केलेल्या स्थीतीत दिले. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी ते जप्त केले आणि त्याप्रमाणे पंचनामा तयार केला आणि त्यावर माझा सहया घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, आता मला जे तिन पंचनामे दाखविले त्यावर माझा सहया नाहीत हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपासणी आरोपींचे वकिल श्रीमती एम.एम.जयसिंघानी मार्फत – नाकारली.</u>**

**<u>फेरतपासणी – नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

नागपूर

दि.04.05.2026.

(एम.एस.गणोरकर)

अति. सत्र न्यायाधिश – 6,

नागपूर.